# रोगी स्त्री बरी होणे व मेलेल्या मुलीला जिवंत करणे

येशु एका नगरात आला, तेव्हा लोक समुदायाने त्याचे स्वागत केले कारण ते त्याची वाट पाहत होते. तेव्हाच याईर नावाचा एक व्यक्ती त्याठिकाणी आला. तो त्या ठिकाणच्या यहुदी धर्म सभाचा मुख्य होता. तो येशूच्या चरणी आला आणि येशूने आपल्या घरी यावे म्हणून विनंती केली. कारण त्याची बारा वर्षाची मुलगी मरणार होती. जेव्हा येशु जात होता तेव्हा त्या ठिकाणी इतकी  गर्दी होती कि ती गर्दी त्याला चेंगरीत होते.

त्याच ठिकाणी एक स्त्री होती तिला बारा वर्षापासून रक्तस्राव होत होता. जे काही तिच्याजवळ होते तिने खर्च करून वैद्यांना देऊन टाकले होते परंतु ती बरी झाली नव्हती. ती त्याच्या मागे आली व त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला स्पर्श केला. व तेव्हाच तिचे रक्त येणे बंद आले. तेव्हा येशूने सांगितले, कोण आहे, ज्याने मला स्पर्श केला आहे? तेव्हा सर्व मनाई करत होते आणि पेत्र म्हणाला, सर्व लोकांनी तुला वेढिले आहे. व सर्व तुझ्यावर पडत आहे.

परंतु येशूने सांगितले, मला कोणीतरी स्पर्श केला आहे, कारण कळाले आहे माझ्यातून शक्ती बाहेर निघाली आहे. त्या स्त्रीने जेव्हा पाहिले की मी लपू शकली नाही. तेव्हा ती कापत कापत येशूच्या चरणी आली. तिने सगळ्या लोकांसमोर सांगितले की मी त्याला स्पर्श केला व कसे लगेच बरी झाली.

हयावर येशूने सांगितले मुली, तुला तुझ्या विश्वासाने बरे केले आहे. शांतीने जा.

तो बोलतच होता इतक्यात यहुदी धर्मसभाचा मुख्य हयाच्या घरातून कोणी आले व म्हणाले, तुझी मुलगी मरण पावली आहे आता गुरूला कष्ट देऊ नको. येशूने हे ऐकले, तेव्हा त्याला म्हटले, “भिऊ नको, विश्वास धर, ती वाचेल”. जेव्हा येशु त्या घरात आला तेव्हा त्याने आपल्याबरोबर पेत्र, योहान, याकोब व मुलीच्या आई बापा व्यतिरिक्त कोणालाही आपल्याबरोबर येऊ दिले नाही. सर्व लोक त्या मुलीसाठी रडत होते. दुखी होत होते. येशु त्यांना बोलला, रडणे बंद करा. कारण ती मेली नाही परंतु झोपली आहे. हयावर लोक त्याच्यावर हसले कारण त्यांना माहित होते की मुलगी मेली आहे.

येशूने त्या मुलीचा हात पकडला व तिला हाक देऊन म्हटले, “मुली, उभी राहा”. आणि तिचा आत्मा परत आला व लगेच उठून उभी राहिली येशूने आज्ञा केली की ‘हिला काही खायला दया’. हयावर मुलीचे आई बाप खूप थक्क झाले. कारण येशूने त्यांना आज्ञा केली की जी घटना घडली आहे हे कोणाला सांगू नका.

**(लुक ८:४०-५६)**